जा.क्रं.नांवाशमनपा/जवमा/ 15542/२०२५
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड
दिनांक - 21/03/2025

## ई - लिलाव सुचना

सर्व वाहनतळ ठेकेदारांना या जाहिर ई-लिलाव (E-AUCTION) सुचनेद्वारे कळविण्यात येते की, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीतील **माता गुजरीजी विसावा उद्यान येथील वाहनतळ** चालविणेसाठी जागेचा मक्ता ताबा तारखेपासून ते तीन वर्षाच्या कालावधी पर्यंत द्यावयाचा आहे.

इच्छुक लिलावधारकांना/ठेकेदारांना लिलावात विहित मुदतीत भाग घेण्यासाठी (https://eauction.gov.in) या संकेतस्थळावर digital signature चे रजिस्ट्रेशन करणे अनिवार्य आहे.

लिलावधारक/ठेकेदार यांनी लिलावाची कोरी निविदा किंमत (Tender Fee) रुपये ५०००/- नापरतावा व इसारा रक्कम EMD रुपये ३०,०००/- रक्कमेचा राष्ट्रीयकृत बैंकेचा धनाकर्ष (डी.डी.) च्या स्वरूपात सिलबंद लिफाफ्यात आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांचे **नावे दि. 25/03/2025....रोजी 15:00...वाजे पासून ते दि. 02/04/2025....रोजी 15:00 वाजे पर्यंत** (शासकीय सुट्टीचे दिवस सोडून कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत) मालमत्ता विभाग, मुख्य प्रशासकीय इमारत, दुसरा मजला, रूम नं. २१५ नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड या कार्यालयाकडे जमा करावेत.

सदरील मक्त्याच्या नियम व अटी (https://eauction.gov.in) या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून ई-लिलाव (E-AUCTION) ऑनलाईन वर खरेदी व जमा करण्यात यावे. निविदा फक्त इंटरनेटवर खरेदी करता येतील व ऑनलाईन भरता येतील.

**ई-लिलाव प्रक्रियेचे वेळापत्रक**

| अ.क्रं | तपशिल | लिलाव प्रसिद्धीचा दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १ | प्रसिद्ध दिनांक | 25.03.2025 | 15.00 |
| २ | कागदपत्र/इसारा रक्कम सुरु करण्याचा दिनांक व वेळ | 25.03.2025 | 15.00 |
| ३ | कागदपत्र/इसारा रक्कम सादर करण्याचा अंतिम दिनांक व वेळ | 02.04.2025 | 15.00 |
| ४ | कागदपत्र/इसारा रक्कम मंजुरीचा दिनांक व वेळ | 02.04.2025 | 15.00 |
| ५ | कागदपत्र/इसारा रक्कम मंजुरीचा अंतिम दिनांक व वेळ | 03.04.2025 | 18.00 |
| ६ | ई-लिलाव सुरु करण्याचा दिनांक व वेळ | 04.04.2025 | 11.00 |
| ७ | ई-लिलाव अंतिम दिनांक व वेळ | 04.04.2025 | 15.00 |

कोणतेही कारण न देता लिलाव अंशतः/पुर्णता मंजुर किंवा नामंजुर करण्याचा अंतिम अधिकार मा.आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना राखुन ठेवला आहे.

ई-लिलाव बाबत काही शंका अथवा तांत्रिक अडचणी असल्यास कृपया २४X७ हेल्पलाईन नं.१८००-३०७०-२२३२ या टोल फ्रि नंबरवर संपर्क साधावा.

सही/-
उपआयुक्त
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

**प्रतिलिपी :-**

१) संपादक, दै. तेलंगणा टाईम्स(२) दै. नांदेड वार्ता........यांना देऊन विनंती करण्यात येते की सदरील ई-निविदा सूचना आपल्या दि. 25/03/2025.. च्या वृत्तपत्रात 12X20 चौ.मी. आकारात कमीत कमी जागेत प्रसिद्ध करून बिलाच्या २ प्रती शासनाच्या मान्यतेच्या प्रतीसह सादर करावे.

२) ई-टेंडरींग/ऑक्शन विभाग, माहिती व तंत्रज्ञान विभाग, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव

३) नोटीस बोर्ड, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड

उपआयुक्त
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका मालकीचे माता गुजरीजी विसावा उद्यान येथील वाहनतळ चालविण्यासाठी द्यावयाच्या मक्त्याच्या नियम व अटी खालील प्रमाणे आहेत.**

१. ई-लिलावात भाग घेण्यासाठी ई-लिलाव फिस रुपये ५०००/- ना परतावा व इसारा (EMD) रूपये ३००००/- (अक्षरी-तीस हजार रूपये फक्त)

२. सदरील वाहनतळाच्या ई-लिलावासाठी सरकारी बोली ही रु.४,७३,३५२/- (अक्षरी-चार लाख त्र्याहत्तर हजार तीनशे बावण्ण रूपये फक्त) राहिल. तसेच बोली हजार च्या पटीत बोलने अनिवार्य आहे.

३. कोणत्याही शासकीय/निमशासकीय कार्यालयामध्ये वाहनतळ ठेकेदार म्हणून काम केल्याचे अनुभव प्रमाणपत्र असणे अनिवार्य आहे.

४. पॅन कार्ड, शॉप ॲक्ट लायसन्स, जी.एस.टी. नंबर इ. कार्यालयात जमा करावे लागेल.

५. सुरक्षाठेव रक्कम म्हणून ३,००,०००/- रुपये कार्यालयात जमा केल्यानंतरच वाहनतळ मक्ता परवाना देण्यात येईल.

६. मक्त्याचा कालावधी ताबा तारखेपासून तीन वर्षाकरिता प्रती वर्ष १० टक्के नैसर्गिक वाढ याप्रमाणे राहिल. ई-लिलावात ज्याची बोली रक्कम जास्त (मनपास मान्य असल्यास) त्याचे नावे मक्ता देण्यात येईल. बोलीत आलेल्या रक्कमेची २५ टक्के रक्कम सात दिवसाच्या आत महानगरपालिकेत जमा करुन परवाना घ्यावे लागेल. उर्वरित रक्कम समान तीन त्रैमासिक हफ्त्यामध्ये कार्यालयात जमा करावी लागेल. रक्कम जमा करण्यास विलंब झाल्यास प्रतिदिन रु.५००/- प्रमाणे दंड आकारण्यात येईल. मक्त्याची रक्कम १ महिन्यापेक्षा जास्त कालावधीस **थकीत** राहिल्यास कोणतीही पुर्व सुचना न देता मक्ता रद्द करण्यात येईल.

७. वाहनतळावर लावण्यात येणाऱ्या कामगारांचे इएसआय (राज्य कर्मचारी विमा) ॲक्ट १९४८ अंतर्गत संरक्षण देणे व सहभाग रक्कम भरणे बंधनकारक राहिल. तसेच कामगारांची ईपीएफ रक्कम नियमाप्रमाणे भरणे बंधनकारक राहिल. तसेच त्याबाबतची अभिलेखे ठेवण्याची जबाबदारी मक्तेदाराची असेल.

८. वाहनतळासाठी महानगरपालिकेने ठरवून दिलेल्या वाहनतळाच्या दराच्या पावत्यावर महानगरपालिकेकडून प्रमाणित करून घेतल्या शिवाय पावत्याचा वापर करता येणार नाही. **अप्रमाणित पावत्यांचा वापर केल्यास फौजदारी गुन्हा नोंदविण्याची कारवाई करण्यात येईल.** महानगरपालिकेने निर्धारित केलेल्या दरपत्रकापेक्षा अधिक दराने वाहनतळ दराची आकारणी व वसुली होणार नाही याची दक्षता घ्यावी.

९. नैसर्गिक अथवा इतर कारणाने नुकसान झाल्यास किंवा वाहन चोरीस गेल्यास त्यास आपली जबाबदारी राहिल. त्यास महानगरपालिका जबाबदार राहणार नाही. यासाठी माफी अथवा नुकसान भरपाईसाठी अर्ज करता येणार नाही.

१०. वाहनतळ जागेतच वाहने उभी करावीत रहदारीस अडथळा होणार नाही याची दक्षता घ्यावी.

११. वाहनतळाच्या जागेचा इतर कोणत्याही प्रकारच्या व्यवसायासाठी वापर करता येणार नाही व असे केल्यास मक्ता रद्द करण्यात येईल.

१२. सदरील मक्त्याचे पूर्ण अधिकार मा. आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना राहतील व तो निर्णय आपणास बंधनकारक राहिल.

१३. वाहनतळाचे दर खालील प्रमाणे राहतील व त्याप्रमाणे दरफलक दर्शनी भागावर ठळक अक्षरात लावावे लागतील.

१४. महानगरपालिके तर्फे नियमाप्रमाणे वेळोवेळी देण्यात येणाऱ्या आदेशाची अंमलबजावणी करावी लागेल. नियमा विरूद्ध कृती केल्यास व आदेशाचे पालन न केल्यास परवाना रद्द करून अनामत रक्कम महानगरपालिका फंडात जमा करण्यात येईल व पुनश्च ई-लिलाव करण्यात येईल.

१५. ५००/- रूपयेच्या बॉन्ड पेपरवर उपरोक्त अटी व शर्ती मान्य असल्याबाबत मक्ता करारनामा करून द्यावा लागेल.

| | |
|---|---|
| **१) कार व इतर (तीन तासाकरीता)** | **रु.५.०० (अक्षरी पाच रूपये फक्त)** |
| **२) मोटार सायकल व ॲटोरिक्षा इतर मोपेड (तीन तासाकरीता)** | **रु.३.०० (अक्षरी तीन रूपये फक्त)** |
| **३) सायकल (तीन तासाकरीता)** | **रु.२.०० (अक्षरी दोन रूपये फक्त)** |

पुढील प्रत्येक तासाकरिता वर प्रमाणे अतिरिक्त दर आकारण्यात येईल.

उपआयुक्त

**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड**